॥ दीप लाविले ज्योती गाती ॥

गायिकाः सुमन कल्याणपूर
गीतः अशोक जी. परांजपे
संगीतः अशोक पत्की

दीप लाविले ज्योती गाती
शुभं करोति बोल रंगती
जा रे जा रे मना माझिया माहेरा ॥ धृ. ॥

माय माउली ओवी गाई
गायनी रंगुनी सूर ग राहिले।
स्मृती हासती डोळ्यामधुनी
दर्पणी दिसतसे घर ग सानुले।
अशाच वेळी, माझ्या भवती
दीप लाविले ज्योती गाती
शुभं करोति बोल रंगती ॥ १ ॥

दिवा आकाशी खूण सांगतो
पाहुनी थांबती पाऊले काय ग ?
ओव्यावरती बालपणीचे
खेळते, स्वप्न कां सारखे सांग ग ?
अशाच वेळी माझ्या भवती
दीप लाविले ज्योती गाती
शुभं करोति बोल रंगती ॥ २ ॥